माहितीचा अधिकार

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

अपील क्रमांक : ४७७/२०२४

अपिलार्थी	प्रतिवादी	
	जन माहिती अधिकारी	**प्रथम अपिलीय अधिकारी**
श्री. हरिश सुधाकर रेहेकवार, किल्ला वार्ड, तिरोडा, मु.पो.ता. तिरोडा जि. गोंदिया-४४१९११	नगर अभियंता, नगर परिषद, तिरोडा, ता. तिरोडा जि. गोंदिया	मुख्याधिकारी, नगर परिषद, तिरोडा, ता. तिरोडा जि. गोंदिया

सुनावणी दिनांक :- १७.०४.२०२६

१. उपस्थिती –

अपिलार्थी	विद्यमान जन माहिती अधिकारी	तत्कालीन जन माहिती अधिकारी	विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी	तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी
उपस्थित	**उपस्थित**	**अनुपस्थित**	**उपस्थित**	**अनुपस्थित**

२. व्दितीय अपील अर्ज –

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : ०९.०२.२०२४

(२) व्दितीय अपील प्राप्त झाल्याचा दिनांक : १२.०२.२०२४

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : मागितलेली माहिती न मिळाल्यामुळे.

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

३. माहिती अर्ज –

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०८.०९.२०२३

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०८.०९.२०२३

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : दिनांक ०६.०५.२०१६ ते आजपर्यंत.

(४) **जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :** १. सहपत्रातील महाराष्ट्र शासन, निर्णय क्र.टिपीएस-१८१५ प्र.क्र. ३५१/१५/नवि-१३ दिनांक ०६.०५.२०१६ नुसार तिरोडा नगर परिषदेने बांधलेल्या अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे (किल्ला वार्डातील) High Resolution satellite Images/ Aerial Photographs (Remote sensing technique) द्वारे शोधलेल्या सर्व

छायाचित्राचे साक्षांकित सत्यप्रत मिळण्याबाबत. २. सदर सहपत्रातील शासन निर्णय नुसार किल्ला वार्डाचे पदनिर्देशित अधिकाऱ्याचे पदनावे, पद ची माहिती मिळण्याबाबत.

(५) **जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही** : अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

४. प्रथम अपील —

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : १३.१०.२०२३

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १३.१०.२०२३

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : मागितलेली माहिती मिळाली नाही.

(४) **अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही** : अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०.११.२०२३ रोजी सुनावणी घेवून, १. अपिलार्थी यांचे अपील मान्य करण्यात येते. २. अपिलार्थी यांना श्री. अखिलेश सोनटक्के, नगर अभियंता, न.प. तिरोडा यांनी ३ दिवसाच्या आत माहिती अपिलार्थीस उपलब्ध करून द्यावे. ३. अपिलार्थीस पुरविण्यात येणारी माहिती ही निशुल्क देण्यात यावी व माहिती करीता येणारा खर्च श्री. अखिलेश सोनटक्के, नगर अभियंता, न.प. तिरोडा यांनी स्वत: वहन करावे. असे आदेशित केले.

५. युक्तीवाद/लेखी खुलासा —

१. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा रचना सहायक, नगर परिषद, तिरोडा, ता. तिरोडा जि. गोंदिया श्री. आवेश सदाफळ उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. अखिलेश सोनटक्के उपस्थित आहेत.

२. आज सुनावणी दरम्यान प्राधिकरणाच्या वतीने नमूद केले की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०.११.२०२३ रोजी सुनावणी घेवून, १. अपिलार्थी यांचे अपील मान्य करण्यात आले. २. अपिलार्थी यांना श्री. अखिलेश सोनटक्के, नगर अभियंता, न.प. तिरोडा यांनी ३ दिवसाच्या आत माहिती अपिलार्थीस उपलब्ध करून द्यावे. ३. अपिलार्थीस पुरविण्यात येणारी माहिती ही निशुल्क देण्यात यावी व माहिती करीता येणारा खर्च श्री. अखिलेश सोनटक्के, नगर अभियंता, न.प. तिरोडा यांनी स्वत: वहन करावे. असे आदेश पारित केले.

३. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित असून त्यांनी नमूद केले की, जन माहिती अधिकारी यांनी मागीतलेली माहिती दिलेली नाही. त्यामुळे संपूर्ण माहिती देण्याबाबत संबंधीतांना आदेशीत करावे.

६. निष्कर्ष — सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

१. अपिलार्थी श्री. हरिश सुधाकर रेहेकवार यांच्या दिनांक ०८.०९.२०२३ रोजीच्या मूळ माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत प्रतिसाद का दिला नाही? त्यामुळे त्यांचेकडून कलम २० अन्वये खुलासा मागविणे क्रमप्राप्त ठरते. त्याचप्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ३०.११.२०२३ रोजीच्या आदेशाचे पालन का केले नाही? याचाही स्वसंस्पष्ट लेखी खुलासा त्यांनी १५ दिवसाच्या आयोगास सादर करावा.

२. अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना ८ दिवसाच्या आत तातडीने प्रतिसाद देत वस्तुस्थितीकळवावी.

सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

अंतरिम आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा रचना सहायक, नगर परिषद, तिरोडा, ता. तिरोडा जि. गोंदिया यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ८ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०८.०९.२०२३ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तातडीने प्रतिसाद देत वस्तुस्थिती कळवावी व त्याची पोहच आयोगास सादर करावी.

२. तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी , नगर परिषद, तिरोडा, ता. तिरोडा जि. गोंदिया यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगास सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसात सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी. सदर आदेशाची प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना पोहचेल, याबाबतची विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी खातरजमा करावी.

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : १७.०४.२०२६

जावक क्रमांक ५७५० दिनांक 3 JUL 2026